नियमीत फौ. ख. क्र. ७०/२०२३
सरकार -वि.- जितेंद्र व इतर
नि.क्र. २४.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सुरज प्रभाकर श्रीरामे,
वय ३८ वर्षे, व्यवसाय – चालक,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. दिनांक १४.०७.२०२३ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता व पोलीस स्टेशनला बोलाविले होते. आता मला दाखविलेला नि.क्र.२५ वरील समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावेळी माझ्यासोबत अक्षय रामटेके होता. त्यावेळी पोलीस भिवापूर बस स्टॅण्ड येथे आले होते. तेथे पोलिसांनी पंचनामा केला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला **नि.क्र.२८** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणताही कागद वाचल्या शिवाय सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला बस स्टॉपवर

बोलाविल्यानंतर तेथे घटनास्थळाचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा तयार केल्यानंतर मी वाचला व सही केली. पंचनामा तयार केला तेव्हा मी घटनास्थळावर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा वाचला नाही हे खोटे सांगत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी मला चांगले ओळखतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला सही करण्यास सांगितले म्हणून मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात काय लिहीले आहे हे मला माहीत नाही.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक - १०.०३.२०२६